मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगूज

अंक ४८ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर २००१

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## कै. सुरेशभाऊ पुण्यतिथी (५.२.२००२) : आवाहन

मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष कै. सुरेशभाऊ मराठे यांनी कुलवृत्तान्त प्रसिद्ध झाल्यानंतर 'कृतकृत्य झालो' असे न मानता मराठे कुलबांधवांनी एकत्र यावे, तरुणांनी व्यवसायनिष्ठ बनावे, हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व मार्गदर्शन मिळावे. साहित्य, संगीत, नाट्य, कथाकथन अशा विविध सांस्कृतिक क्षेत्रांत कुलबांधवांनी यश प्राप्त करावे या हेतूने प्रतिष्ठानच्या माध्यमांतून त्यांनी अनेक उपक्रम राबविले. वैयक्तिक पातळीवरहि गुणी, होतकरू, तरुणांना, स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारे सहाय्य केले.

त्यांचे आवडते उपक्रम प्रतिष्ठानच्या माध्यमांतून चालू टेवणे हेच त्यांचे उचित पुण्यस्मरण. यादृष्टीने ५ नोव्हेंबर २००० रोजी झालेल्या प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कै. सुरेशभाऊ स्मृति निधी स्थापन करण्यात आला. या निधीच्या व्याजातून सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात यावा, तसेच मेळावे, कार्यकर्त्यांची चर्चासत्रे आयोजित करण्यात यावी, तरुणांच्या मनात स्वत:चा उद्योग-व्यवसाय करण्याची प्रेरणा निर्माण होण्याच्या दृष्टीने यशस्वी, कल्पक उद्योग-व्यावसायिकांशी त्यांचा संपर्क निर्माण व्हावा म्हणून मेळावे-चर्चासत्रे आयोजित करावी असे ठरविण्यांत आले.

५ फेब्रुवारी २००२ हा सुरेशभाऊंचा द्वितीय स्मृतिदिन. त्या दिवशी विविध गावातील, पुण्यामुंबईसारख्या महानगरातल्या निरनिराळ्या वॉर्ड, विभाग, उपनगरांत राहणाऱ्या कुलबांधवांनी सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत-क्रीडा-कला स्पर्धा, उद्योजक व्यावसायिकांची व्याख्याने-चर्चासत्रे इ. उपक्रम आयोजित करून आगळ्या-वेगळ्या पद्धतीने कै. सुरेशभाऊंचे पुण्यस्मरण केले तर ते प्रतिष्ठानची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने उपकारक ठरेल.

इतर काहीच जमले नाही तर अशा प्रकारच्या कार्याची मुहूर्तमेढ म्हणून **निदान गावातल्या-वॉर्डातल्या-उपनगरातल्या कुलबांधवांनी सहकुटुंब एकत्र जमून परस्पर परिचय तरी करून घ्यावा असे आवाहन आहे.** परिचयातून नित्य/नैमित्तिक संपर्क व पुढे परस्पर सहकार्य अशा तऱ्हेने गावा-गावात प्रतिष्ठानची केंद्रे कार्यरत होतील.

केंद्रचालक म्हणून पुढाकार घेऊ इच्छिणाऱ्यांनी आपापल्या गावातल्या कुलबांधवांची नावे व पत्ते तसेच आर्थिक व अन्य बाबतीत मार्गदर्शनासाठी **लक्ष्मण शंकर मराठे**, अ-२३, सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व), मुंबई -४०० ०८१ **(दूरध्वनी : ५६८०१०४)** यांचेशी त्वरित संपर्क साधावा. **केंद्रचालिका म्हणून (माहेरवाशिणीसह) कुलभगिनींची कामगिरी 'काकण'भर सरस ठरेल** असा विश्वास वाटतो.

**मित्रहो, चला तर मग. लागूया आपण सारे जोमाने कामाला -**

**मराठे तितुके मेळवावे**
**एकमेका साह्य करावे**
**सहकार्याने हित साधावे**
**सकल जनांचे**

**- संपादक**

***

**वार्षिक सर्वसाधारण सभा - पूर्वसूचना**

प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. ३० डिसेंबर २००१** रोजी सकाळी ९.३० वाजता होणार आहे. सभेची सूचना व विषयपत्रिका येईलच. ३० डिसेंबर सभेसाठी मोकळा ठेवावा यासाठी ही पूर्वसूचना.

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. तसेच ४थ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता गरजेनुसार कार्यकारी मंडळ आणि उपसमित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्यात येते. त्यामुळे उपसमित्या आणि कार्यकारी मंडळ यांचे मधे परस्पर संपर्काचे सातत्य रहायला मदत होते.

कार्यकारी मंडळाच्या सभेच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत सप्टें. ८, ऑक्टो. १३ आणि नोव्हेंबर २७ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. यापैकी ८ सप्टेंबरच्या सभेला संस्थेचे विश्वस्त श्री. आनंद यशवंत (पृ. २७७) आणि श्री. अरविंद दामोदर (पृ. २९२) आवर्जून उपस्थित होते. तसेच बोरिवलीत हितगुज अंकाचे वाटप करण्याची जबाबदारी स्वीकारणारे श्री. राहूल मोरेश्वर खांबेटे (पृ. ७०२) हेहि बोरिवलीतील तहहयात वर्गणीदारांचे अंक घेऊन जाण्याच्या निमित्ताने उपस्थित होते.

**बिनव्याजी शैक्षणिक कर्ज**

८ सप्टेंबरच्या सभेत रवींद्र रामचंद्र खांबेटे (पृ. ६९८) याला कंप्युटर इंजिनिअरिंग शिक्षणासाठी रु. १०,००० बिनव्याजी कर्ज विनय खांबेटे स्मृति निधीमधून मंजूर करण्यात आले. याच निधीमधून २७ नोव्हेंबरच्या सभेत मयुरेश श्रीधर (पृ. ३१४) यालाही इंजिनिअरिंग शिक्षणासाठी रु. १०,००० मंजूर करण्यात आले. या संदर्भात अुद्योगप्रवर्तन समितीचे संयोजक **श्री. हेमंत महादेव** (पृ. ४७१) यांनी अशी सूचना केली की अनेक बँका अलिकडे शैक्षणिक कर्ज देण्यासाठी अुत्सुक आहेत. कर्जाची गरज खूप मोठी असते ही गोष्ट लक्षात घेता ती भागवण्याच्या दृष्टीने आपण कुलबांधवांना बँकेच्या कर्जासाठी जी मार्जिन मनी द्यावी लागते त्यासाठी कर्ज दिल्यास बँकांकडून त्यांना मोठी रक्कम कर्जाऊ मिळू शकेल. तत्वत: ही भूमिका मान्य करण्यात आली. त्या दृष्टीने श्री. हेमंत मराठे यांनी एखाद्या बँकेच्या सहकार्याने अशी योजना राबवण्याबाबत निश्चित प्रस्ताव तयार केल्यास त्याचा विचार करणे शक्य आहे असे कार्यकारी मंडळाला वाटते. कुलबांधवांनीहि याबाबतीत काही सूचना केल्यास कार्यकारी मंडळाला त्या मार्गदर्शक ठरतील.

**शिक्षण निधी देणग्या**

कुलबांधवांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रतिष्ठानच्या शिक्षण निधीला नित्य नेमाने देणग्या देण्याचे ठरविल्यास हा निधी सातत्याने वाढत जाईल असा विचार पुण्यातील वर्धापनदिनाच्या वेळी आणि प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत व्यक्त होत. त्यांनुसार **श्रीमती सरोजिनी प्रभाकर** (पृ.३८८) यांचेकडून त्यांच्या खालील कुटुंबियांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येकी रु. १०० प्रमाणे शिक्षण निधीला वाढदिवस देणग्या मिळाल्या -

| | नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|
| १. | श्रीमती सरोजिनी प्रभाकर | २७.०१.२९ |
| २. | श्रीमती लीला बळवंत | २३.०७.३२ |
| ३. | सौ. गौरी किशोर गद्रे | १०.०९.५८ |
| ४. | कर्नल (निवृत्त) प्रमोदन प्रभाकर | १५.०८.५१ |
| ५. | डॉ. सौ. स्वाती प्रमोदन | ०७.०७.५५ |
| ६. | वैद्य मुक्ता प्रमोदन | ११.०५.७८ |
| ७. | वैद्य प्राजक्ता प्रमोदन | ११.०५.७८ |
| ८. | कुमार केदार प्रमोदन | ०४.०४.८६ |
| ९. | श्री. श्रीनिवास प्रभाकर | १२.०७.५४ |
| १०. | सौ. माधुरी श्रीनिवास | ०६.०२.५८ |
| ११. | कुमारी अवंती श्रीनिवास | ०४.०४.८५ |
| १२. | कुमार अभय श्रीनिवास | २२.११.८८ |

**कै. सुरेशभाऊ स्मृतिनिधी देणग्या**

१. श्री. प्रकाश गणेश निद्वांस, (पृ. ६४५) अहमदाबाद (मार्च २००१ मध्ये आलेली रक्कम) रु.५००

## जाहीर निमंत्रण

**वर्धापन दिन समारंभ - पुणे शाखा**

मराठे प्रतिष्ठानचा २३वा वर्धापन दिन **शनिवार दिनांक २६ जानेवारी २००२** रोजी साजरा होणार आहे. या कार्यक्रमात भूकंप, पूर, आग यासारख्या नैसर्गिक किंवा मानवी चुकांमुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींना तोंड कसे द्यायचे ? यासंबंधी निवृत्त कर्नल **प्रमोदन मराठे यांचे 'समाजाची आपत्कालीन जबाबदारी'** या विषयावर पारदर्शिकांसमवेत व्याख्यान होणार आहे तरी या कार्यक्रमास पुण्यातील व पुण्याबाहेरीलही सर्व कुलबांधवांनी, मुख्यत्वे तरुणांनी मित्र-मैत्रिणींसमवेत जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

**कार्यक्रम विनामूल्य आहे**

**-: स्थळ :-**

वेदशास्त्रोत्तजक सभेचे सभागृह
पेशवे पार्क चौक, विश्व हॉटेल समोर
पुणे - ४११०३०

**-: वेळ :-**

सायंकाळी ४.३० ते ७.३०

**हितगुज वितरण**

सभासदांमार्फत हितगुज वितरणाची व्यवस्था हळुहळु स्थिरावत आहे. याबाबतींत खालीलप्रमाणे सभासद सहकार्य करीत आहेत -

**विलेपार्ले**

१. अनंत गोपाळ चक्रदेव (पृ. ७२१), फोन : ६१४७०१०
२. सौ. स्वाती हेमंत (पृ.४७१) फोन :६१७७७५७
३. सौ. आरती विनायक खांबेटे व पुत्र अव्दैत (पृ.६९४) फोन : ८२२९३३०

**अंधेरी**

श्री. श्रीकांत माधव (पृ. १६) फोन : ८३२००९२



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

**गोमंतक मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष 'ह.मो'**

मराठीतले प्रथितयश लेखक, संपादक व पत्रकार **श्री. हनुमंत मोरेश्वर (पृ. ५३७) ऊर्फ 'ह.मो.'** यांच्या अध्यक्षतेखाली २४ वे गोमंतक मराठी साहित्य संमेलन ९, १० व ११ नोव्हेंबर रोजी केपे, गोवा येथे पार पडले. आपल्या भाषणांत मराठीची सद्यस्थिति आणि भवितव्य याबाबत **'ह.मो.' म्हणाले -** ''बहुसंख्य जनता भाषेकडे केवळ संपर्काचे साधन म्हणून बघते; मातृभाषा हा अस्मितेचा प्रश्न फार थोड्या लोकांचे बाबतीत असतो. इंग्रजीत प्राविण्य मिळवण्याची ईर्षा सर्वत्र निर्माण होत असताना मातृभाषेबाबतची अस्मिता टिकवून ठेवणे हे एक आव्हानच ठरणार आहे. इंग्रजी हटाव आता चालणार नाही; इंग्रजीसाठी प्रादेशिक भाषा मारण्याचीहि काही गरज नाही. यापुढे खरे तर मराठीसह इंग्रजी अथवा इंग्रजीसह मराठी अशी घोषणा देण्याची गरज आहे.''

**'ह.मो.' ना दमाणी पुरस्कार**

आपल्या वैशिष्ट्यपूर्ण समारंभामुळे महाराष्ट्रात नावारूपास आलेल्या दमाणी पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून त्यामध्ये 'ह.मों.' च्या 'बालकाण्ड' या आत्मकथनपर पुस्तकाचा समावेश आहे. रोख १५ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे चौदावे वर्ष. १६ डिसेंबर रोजी सोलापुरात पुरस्कार वितरण समारंभ व्हावयाचा आहे. मराठे परिवारातर्फे 'ह.मों.' चे अभिनंदन.

**वेंगुर्ले टेलिफोन ग्राहक संघटनेचे अध्यक्ष श्रीधर केशव**

वेंगुर्ले तालुका टेलिफोन ग्राहक संघटनेच्या ३० सप्टेंबर रोजी झालेल्या वार्षिक सभेत वेंगुर्ले येथील पत्रकार **'किरात' चे संपादक श्रीधर केशव** (पृ. ३९६) यांची नवीन कार्यकारिणीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. टेलिफोन ग्राहक संघटनेचे कार्य प्रभावीपणे करण्यात श्रीधर केशव यांस यश येवो अशा मराठे परिवारातर्फे शुभेच्छा!

**जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड**

श्री. वामन गणेश (पृ. ५०३)
फोन : ८२६९४०२

**बोरिवली, कांदिवली, दहिसर**

श्री. राहूल मोरेश्वर खांबेटे (पृ. ७०२)
फोन : ८०८४९७६

**आगाशी, भायंदर, नालासोपारा, वसई, विरार (जि. ठाणे)**

श्री. हेमंत अरुण (पृ. २१) फोन : (९५२५०)-४३३०३८

**मुलुंड**

दत्तात्रय आत्माराम व पुत्र उदय (पृ.३२६),
फोन : ५६७५४८

**कुळगांव-बदलापूर (जि. ठाणे)**

वसंत विश्वनाथ व पुत्र उल्हास (पृ.३३५),
ऋतुराज अपार्टमेंट, गांधी चौक

**पुणे जिल्हा**

पुणे जिल्ह्यातल्या १६० अंकांपैकी लोणावळ्यासारख्या लांबलांबच्या पत्यांवरचे १५ अंक वगळता सप्टें. २००१ चे अंक विभागवार जबाबदारी स्वीकारून पुढील सभासदांमार्फत वितरित करण्यात आले. सर्वश्री अच्युत महादेव (शुक्रवार पेठ), कमलाकर जाईल (शनिवार, नारायण), रमेश मराठे (भांडारकर रोड), अरुण मराठे (सदाशिव पेठ), आण्णा मराठे (सहकार नगर), मधुकर मराठे (नवसह्याद्रि), माधव मराठे (औंध, गणेश खिंड), य. ग. मराठे (पौड रोड) विष्णु रा. मराठे (झाला अपार्टमेंट), प्रमोद मराठे (रास्ता पेठ) श्रीकृष्ण सि. मराठे (दत्तवाडी, सिंहगड रोड), लक्ष्मण ग. मराठे (लोकमान्य नगर), अरुणाताई मराठे (चिंचवड), नितिन मराठे (पिंपरी), अनिल मराठे (प्रभात रोड, एरंडवणे), मुकुंद मराठे (सदाशिव पेठ), श्रीराम मराठे (कोथरुड).

वरील प्रतिनिधींनी स्वत:चा पत्ता, फोन नंबर देऊन त्यांचेकडून अंक नेण्याबाबत वर्गणीदारांना पत्रे पाठवली. पण स्वत: येऊन अंक घेऊन जाण्याचे प्रमाण फारच अल्प होते. त्यामुळे बहुतेक सर्व प्रतिनिधींनी आपापल्या विभांगातील अंक घरपोच नेऊन दिले. त्यांनाहि तें सोईचे वाटले. यामधून त्यांचा सभासदांशी संपर्क निर्माण होण्याचे व परस्परपरिचय वाढण्याचे मोठे कार्य होईल.

**सांगली जिल्हा**

सांगलीतूनहि श्री. वि. म. मराठे यांनी सांगली-मिरज भागांतले अंक वाटप करण्याची तयारी दर्शविली आहे.

महाराष्ट्रांतल्या व महाराष्ट्राबाहेरच्याहि अन्य गावांतून याप्रमाणे अंक वाटप करण्यासाठी कुलबांधवांनी पुढे यावे. त्यामुळे पोस्टेज खर्च तर वाचेलच. पण कुलबांधवांचा एकमेकांशी संपर्क निर्माण होईल, सतत राहील हा अधिक मोलाचा फायदा या व्यवस्थेतून होणार आहे.

***

**तरुणांसाठी लेखनस्पर्धा**

जून २००१ च्या हितगुजमध्ये तरुणांसाठी लेखनस्पर्धा जाहीर करण्यात आली होती. कथा, प्रवासवर्णन, अनुभव-चिंतनात्मक लेखन आणि कविता या चार गटातले साहित्य मागविले होते. प्रत्येक गटांत किमान ५ स्पर्धकांकडून साहित्य आले. तरच त्या गटासाठी पारितोषिक द्यावयाचे होते.

मात्र स्पर्धेला प्रतिसाद नगण्य मिळाला - ३ कविता, २ कथा, १ प्रवासवर्णन. त्यामुळे ही स्पर्धा रद्द करण्यात आली आहे.

तरुण वाचक हे केवळ 'वाचक' च आहेत; लेखक होऊ इच्छित नाहीत, असा याचा अर्थ समजायचा काय? की तरुण मंडळी 'वाचक' हि नसतात? त्यामुळे स्पर्धेची घोषणाच त्यांच्यापर्यंत पोचली नाही?

सभासद-वाचकांनी (फक्त तरुण नव्हे, सर्वच) यासंबंधी त्यांचे विचार कळवल्यास ते मार्गदर्शक ठरतील - संपादक

***



Marathe Pratishthan

**बी.कॉम. परीक्षेत जिल्ह्यात प्रथम - सुलक्षणा बाळकृष्ण**

तुळस येथील कुलबांधव **कै. बाळकृष्ण माधव (पृ. ५०५) यांची मुलगी सुलक्षणा** हिने मुंबई विभागाच्या बी.कॉम. परीक्षेत ४७३ गुण मिळवून जिल्ह्यांत प्रथम क्रमांक मिळवला. याआधी संगणक परीक्षेतहि तिने सावंतवाडी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला होता.

**सहवेदना**

१. आगाशी (जि. ठाणे) येथील सभासद **पांडुरंग महादेव** (पृ. ८८) यांचे ६.८.१९९९ रोजी ६१ व्या वर्षी निधन झाले.

२. पुण्यातले प्रतिष्ठानचे सभासद **हेमंत दिवाकर विद्वांस** (पृ. ३५६), खोखोपटु, यांचे वयाच्या ३० व्या वर्षी ३०.५.२००१ रोजी अपघाती निधन झाले. १९.५.२००१ रोजी त्यांना अपघात झाला होता.

३. नागपूर मधील सभासद **विष्णू विश्वनाथ जोशी यांची आई राधाबाई विश्वनाथ** (पृ. ७५०) यांना ६.८.२००१ रोजी देवाज्ञा झाली. त्यांचे वय ९६ होते.

४. वाई, जि. सातारा येथील सभासद डॉ. **विवेक प्रभाकर यांच्या मातोश्री प्रतिभा प्रभाकर** (पृ. २२२) यांचे ८३व्या वर्षी वृध्दापकाळामुळे मंगळवार दि. ९.१०.२००१ रोजी निधन झाले. त्यांचे पति डॉ. प्रभाकर शंकर हे जुन्या पिढीतले एक प्रख्यात सेवाभावी शल्यविशारद होते. वाई म्युनिसिपालिटीचे ते पहिले अध्यक्ष होते.

५. औरंगाबाद मधील सभासद सुधीर चिंतामण विद्वांस यांचे वडील **चिंतामण पांडुरंग** (पृ. ६४६) यांना १४.१०.२००१ रोजी देवाज्ञा झाली. ते ८५ वर्षांचे होते.

६. मुंबईतील सभासद **पुरुषोत्तम (राजा) वासुदेव** (पृ. ४२७) यांचे गोव्यात पर्यटनासाठी गेले असता हार्ट ॲटॅक येऊन ८.११.२००१ रोजी अचानक निधन झाले. गुंतवणुक विषयक बाबींचा त्यांचा व्यासंग होता. परिचित त्यांचा सल्ला घेत असत.

७. चुनाभट्टी, मुंबई येथील सभासद **विष्णू मारुती (रटाटे)**, पृ. ७५९, यांचे २.१२.२००१ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. वय ८६. मात्र विचार प्रागतिक-त्यांनी नेत्रदान केले होते. प्रतिष्ठानच्या सभांतील चर्चेत ते हिरीरीने भाग घेत असत.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खांत मराठे परिवार सहभागी आहे.**

अनुभवामृत

# मी तुमचा नाही का ?

**- विनायक केशव** (पृ. २०), वरळी, मुंबई

जवळ जवळ दहा-बारा वर्ष उलटून गेली त्या प्रसंगाला. पण अजूनही आठवण झाली की मन सुन्न होतं. कां कोण जाणे पण एक तऱ्हेची अपराधीपणाची भावना सलते.

त्यांचं असं झालं. मी आणि प्रतिष्ठानचे भीष्माचार्य श्री. वि. गो. तथा भाऊसाहेब (कुलवृत्तांत सबकुछ) मराठे प्रतिष्ठानचे कार्य रुजविण्यासाठी, खास करून कुलवृत्तांत अद्ययावत करण्याकरिता मोठ्या दौऱ्यावर गेलो होतो. सांगली - मिरज - इचलकरंजी - बेळगांव असा कार्यक्रम होता.

या दौऱ्यात अनेकजण आम्हाला आमच्या तात्पुरत्या कचेरीत भेटले. आम्ही अनेकांच्या घरी गेलो. काहीजणांच्या दारापर्यंतच आम्हाला प्रवेश मिळाला तर काहीजणांच्या थेट सैपाकघरात जाऊन आम्ही मनसोक्त पक्वान्नांचा आस्वाद घेतला. त्यातलीच ही एक आठवण.

जवळ असलेल्या तुटपुंज्या माहितीवरून चौकशी करत करत आम्ही एका अत्यंत जीर्ण घरापाशी आलो. आपला एक कुलबंधु या घरात रहात असेल यावर विश्वास बसेना. पण प्रयत्न करून पहावा म्हणून दार ठोठावलं. दार उघडलं गेलं. नांव विचारल. महिती बरोबर ठरली. पण आम्ही दिङ्मूढ झालो. काय सांगू ? साक्षात् दारिद्र्य डोळ्यासमोर उभं ठाकलं. पण आमच्या कुलबंधूंच्या डोळ्यात मात्र विश्वाचं आतिथ्य साठलं होतं. एकच खोली. त्यातल्या त्यात जागा करून आम्ही बसलो. सौ. वहिनींची तारांबळ उडाली. त्या चटकन दार ओलांडून गेल्या. भाऊसाहेब आणि मी एकमेकांच्या तोंडाकडे पहात होतो. सुरवात कशी करायची ? पण आमच्या कुलबंधूनीच प्रश्न सोडवला.

''तुम्ही गावात आलात हे मला कळलं. खरं म्हणजे मीच येणार होतो माहिती द्यायला. ही पहा सर्व माहिती मी कागदावर लिहून ठेवली आहे.

कागदावरची मोत्यासारखी अक्षरं पाहून मला उगीचच वाटलं. अरे, ही अक्षरं मोती होऊन जर या घरात ओघळली असती तर ?

भाऊसाहेबांनी सर्व माहिती वाचली. आमच्या जवळ असलेल्या माहितीशी पडताळून पाहिली. अधिक माहिती विचारून घेतली.

आपल्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे माहिती मिळवल्यानंतर जर कुलबंधु सभासद नसेल तर आपण त्याला सभासद करून घेतो. आता या बाबतीत सभासद वर्गणीची व देणगीची गोष्ट काढणं शक्यच नव्हत.

आमची चुळबुळ त्या गृहस्थाच्या लक्षात आली.

आम्ही निरोप घेण्यासाठी उठू लागलो. ''थांबा. एक मिनीट, कायं घेणार ? चहा का लिंबू सरबत ?''

''खरंच काही नको. प्रत्येक ठिकाणी चहा घेऊन कंटाळा आलाय''

''वा, असं कसं होईल'' त्यानी दरवाज्याबाहेर नजर शेजारी टाकली. सौ. वहिनी, पातळ बदलून दोन सरबताचे पेले घेऊन आल्या.

''घ्या ना. दुसरं काही आयत्यावेळी देता येत नाही'' पेले पुढे ठेवीत सौ. वहिनी मोठ्या आशेने आमच्याकडे पहात होत्या.

आम्ही सरबत घेतलं आणि निघू लागलो.

''अरेच्या, मुख्य गोष्ट राहिलीच की''

''कां ? आणखी माहिती आहे तुमच्याजवळ ?''

''माहिती नाही पण प्रतिष्ठानला अत्यंत जरूरी असलेली वस्तू आहे ना माझ्याजवळ'' आमच्या लक्षात त्यांच्या बोलण्याचा अर्थ येईना.



Marathe Pratishthan

त्या गृहस्थानी वळचणीला हात घालून एक पुडकं काढलं. आमच्या समोर ते उघडून त्यातले पैसे मोजू लागले.

''हं. ही आमची वर्गणी. शंभर रुपये आहेत. कुलवृत्तांताला देणगी देण्याची इच्छा होती. पण कायं करणार? गेले जवळ जवळ वर्षभर कामाशिवाय मी घरी बसून आहे.''

आम्ही दगडासारखे मख्ख बसून राहिलो. आमच्याकडे न्याहाळीत ते म्हणाले ''कां? विचार कसला करता? मी तुमचा नाही कां?''

खरंच इतर कोणत्याही कारणासाठी नसलं तरी अशा कुलबांधवांचे अश्रू पुसण्यासाठी, जमलं तर नुसत्या आशेच्या चार गोष्टी सांगण्यासाठी नव्हे तर प्रत्यक्ष मदत करण्यासाठी, त्यांच्या मुलाबाळांना ताठ मानेनी जगण्याचा मंत्र देण्यासाठी मराठे प्रतिष्ठान टिकलं पाहिजे. वाढलं पाहिजे. अशा घराघरापर्यंत पोचलं पाहिजे. नाही कां?

***

## प्राप्तिकर : धाडी व जप्ती

**- गजानन चिंतामण**, (पृ. १२९), पुणे

प्रस्तुत लेखामध्ये आपण धाडी व जप्ती (सर्च अँड सिझर) याविषयी माहिती घेणार आहोत. धाडीचा मुख्य उद्देश म्हणजे न दाखविलेले उत्पन्न व संपत्ती शोधून काढणे.

### धाडीचा निर्णय केव्हा घेतात

१) प्राप्तिकर खात्याकडे असलेल्या माहितीच्या आधारे. २) करदाता समन्स किंवा नोटिशीला उत्तर देण्याचे टाळत असल्यास. ३) करदाता समन्स किंवा नोटीस पाठवूनसुध्दा जमाखर्चाचे दप्तर अथवा कागदपत्रे हजर करीत नसल्यास. ४) एखाद्याकडे रोख, सोन्याच्या चिपा, चांदीच्या लगडी, दागिने किंवा मौल्यवान वस्तू असल्याची माहिती प्राप्तिकर खात्याला मिळाली असल्यास.

येथे एक महत्त्वाचे लक्षात घ्या की प्राप्तिकर खात्याकडे पूर्ण माहिती असल्यासच धाडीचा निर्णय घेतला जातो. नुसत्या अफवा अथवा निनावी आलेली माहिती याचा आधार घेण्याचे नेहमीच खात्याकडून टाळले जाते.

### करदात्याचे अधिकार

१) झडतीचे अधिकारपत्र पाहणे. २) तपासणी पथक सभासदांची नावे व त्यांचे अधिकार यांची माहिती घेणे. ३) तपासणीपूर्वी व नंतर पथकाची अंगझडती घेणे. ४) महिलांच्या अंगझडतीसाठी महिला अधिकाऱ्यांचा आग्रह धरणे. ५) पसंतीचे व सन्माननीय असे दोन रहिवासी पंच म्हणून बोलविणे. ६) महिलांच्या खोलीच्या झडतीसाठी महिला अधिकाऱ्यांचा आग्रह धरणे. ७) तब्येत बरी नसल्यास डॉक्टरला बोलविणे. ८) मुलाना बॅग तपासून घेऊन शाळेत पाठविणे. ९) रोजचे सर्व दैनंदिन कार्यक्रम करणे. १०) कपाटांना लावलेली सीले बंद करताना व उघडताना पाहणे. ११) जबाब अधिकारी जबाब बरोबर लिहून घेतोय ना याकडे लक्ष ठेवणे. १२) पंचनामा व त्यासोबतच्या कागदपत्रांची नक्कल मागणे. १३) जबाबची प्रत मागणे. १४) जप्त केलेल्या वह्यांतील महत्त्वाचे उतारे अधिकाऱ्यांसमक्ष काढणे. १५) निरनिराळ्या जागांतून/खोल्यांतून मिळालेल्या वस्तूंची स्वतंत्र यादी करणे. १६) आपल्याला समजणाऱ्या भाषेत जबाब घेण्याचा आग्रह करणे. १७) जबाबाचे टिपण करण्याची व्यवस्था करणे.

### करदात्याची कर्तव्ये

१) तपासणी पथकाला अडथळा न करता मुक्त प्रवेश देणे. २) झडतीचे वॉरंट पाहून त्यावर सही करणे. ३) मालमत्ता, हिशोबांच्या वह्या व त्याच्या किल्ल्या देणे. ४) आपल्या जागेत सापडलेल्या मालमत्ता, हिशोबी वह्या, कागदपत्रे याच्या मालकीबद्दलचा खुलासा करणे. ५) जागेतील सर्वांची ओळत करून देणे व त्यांचे संबंध सांगणे. ६) बाहेरून येणाऱ्या लोकांना प्रवेश न देणे. ७) अधिकाऱ्यांच्या नकळत कोणतीही माहिती अथवा वस्तू न हलविणे. ८) विचारलेल्या सर्व प्रश्नांची माहिती/उत्तरे बरोबर देणे. ९) जबाब याद्या/पंचनामा यावर सह्या करणे. १०) झडतीच्या वेळी शांतता ठेवणे.

येथे एक लक्षात ठेवावे की खोटे अजिबात बोलू नये. याचे कारण सर्व पुरावा हा अधिकाऱ्यांच्या हाती असतो. शिवाय एक खोटे बोलण्यासाठी दहा खोटे बोलावे/करावे लागते. झडती अधिकारी करदात्याचा जबाब घेत असताना तिसऱ्या व्यक्तिला उत्तरे सुचविण्याचा अधिकार नसतो. अशा वेळी झडती अधिकाऱ्याला उत्तरे देण्यास नकार दिल्यास अथवा खोटी माहिती दिल्यास इंडियन पिनल कोडच्या कलम १७९, १८१ व १९१ खाली करदात्याविरुध्द कार्यवाही होऊन शिक्षा, तुरुंगवास व दंड होण्याची शक्यता असते. अशा वेळी झडती अधिकाऱ्यांना सहकार्य दिल्यास ते पण आपल्याला भरपूर सहकार्य देतात हे लक्षात घ्यावे.

### अधिकाऱ्यांचे हक्क/अधिकार/कर्तव्ये

१) ओळखपत्र दाखविणे. २) धाडीचा आदेश करदात्याला दाखविणे. ३) धाडीच्या जागेतील व्यक्तिला बाहेर जाऊ न देणे. ४) बाहेरच्या व्यक्तीला आत येऊ न देणे. ५) दूरध्वनीचा ताबा घेणे. ६) मुलांना शाळेत जाण्याची व इतरानी अन्य कामांसाठी जाण्याची परवानगी देणे. ७) करदाता व घरातील इतरांची अंगझडती घेणे. ८) दोन साक्षीदार/पंच खास करून

---

**हसरे हितगुज**

### के.पी.एम. फार्मसीच्या गोळ्या

माझ्या लहानपणी एकदा डॉक्टर म्हणाले 'के.पी.एम.' फार्मसीच्या गोळ्या घ्या. मी कंपौंडरकडे गेलो. गोळ्या मागितल्या. त्याने माझ्याकडे एकदा हसून पाहिले आणि म्हणाला याचा अर्थ 'खाओ, पिओ, मजा करो.'

सध्याच्या जमान्यातहि डॉक्टर हे सांगतात. पण त्यापूर्वी पेशंटला अनेक खर्चिक टेस्ट करून रिपोर्ट आणायला लावतात. या चाचण्यांच्या दिव्यातून गेल्यानंतर काय मजा करणार!

**- गजानन भास्कर** (पृ. ४२७)
घाटकोपर, मुंबई



Marathe Pratishthan

करदात्याच्या पसंतीचे बोलाविणे. ९) घरांतील सर्व जागा, कपाटे, तिजोऱ्या, फ्रिज, डबे, कपडे, गाद्या, पलंग, देवघर, देव्हारे व इतर जे योग्य वाटेल ते सर्व पाहणे. ११) शंका आल्यास भिंती, जमीन, फर्निचर फोडून पाहणे. १२) हिशोब वह्या, फायली, कागदपत्रे, दागदागिने, रोकड यांची यादी करुन ते ताब्यात घेणे. १३) स्त्रियांच्या व पुरुषांच्या अंगावरील दागिन्यांची यादी करणे. १४) संपूर्ण धाडीचा पंचनामा करून त्यावर अधिकारी, दोन पंच व करदाता अशा सर्वांच्या सह्या घेणे. १५) आवश्यकता वाटल्यास करदात्याचा पुन्हा जबाब घेणे.

विवाहित स्त्री करदात्याकडे ५०० ग्रॅम्स, अविवाहित स्त्रीकडे २५० ग्रॅम्स आणि पुरुषाकडे १०० ग्रॅम्स या प्रमाणात दागिने असल्यास ते जप्त करण्याचा अधिकार धाड अधिकाऱ्यास नाही.

**करदात्याने घ्यावयाची नेहमीची खबरदारी**

१) रोजच्या रोज हिशोब लिहिणे. २) रोख शिल्लक हिशोबाप्रमाणे ठेवणे/असणे. ३) शिलकी मालाचे रजिस्टर रोजच्या रोज लिहिणे. ४) अनावश्यक कागदपत्रे रोजच्या रोज निकाली काढणे. ५) शिल्लक माल कमी-जास्त असल्यास त्याची कारणे तयार ठेवणे. ६) सर्व बिल्स/व्हाऊचर्स रोजच्या रोज करणे. ७) सर्व हिशोब वह्यांच्या अंतर्गत नोंदी रोजच्या रोज करणे. ८) चलन्स तसेच खरेदी-विक्री बिल्स यांची रोजच्या रोज मिळवणी करणे. ९) धंद्याच्या तिजोरीत इतरांचे पैसे, दागदागिने व मौल्यवान वस्तू न ठेवणे. १०) जमाखर्चाच्या वह्याचे दोन संच (सेट्स) कधीही न ठेवणे. ११) नेहमी आयकर विवरणपत्र मुदतीत भरणे. १२) प्राप्तिकर मुदतीत भरणे.

योग्य ते उत्पन्न दाखवून कायदेशीर सवलतींचा फायदा घेऊन कर भरल्यास पाहणी व धाडीची काळजी करण्याचे कारण नाही. जमाखर्चाच्या वह्या जप्त केल्या असल्यास नवीन वह्या सुरू कराव्या. जबाबांत चुकीची माहिती दिली असल्यास शक्य तितक्या लवकर सत्य परिस्थिती कळवावी. वरीलप्रमाणे करदाता, वागल्यास 'कर नाही त्याला डर कशाला' याप्रमाणे वागता येणे शक्य असले तरी धाड अधिकाऱ्यांच्या हाती सत्ता असल्यामुळे 'तू मोठ्या बापाचा' असे म्हणून करदात्याने नमते घेणे त्याच्या हिताचे असते.

***

# Kashmir : A Challenge to Indian Strategists

- **Col. P. P. Marathe** Retd. (P.388) Pune

***Excerpts of a talk organised by Marathe Pratishthan in Pune on 23 April 2001.***

Kashmir forms a knot that has easy approaches from and to the countries like China, Tibet (now in occupation by China), Pakistan, Afghanistan and even Tajikistan. The events in these neighbouring countries have long standing effects on the Kashmir scenario. India, being the Mother State of Kashmir, has been facing tough challenges due to the turbulence in Kashmir for the past six decades.

Geographically and Demographically, **Kashmir could be divided into three distinct regions - the Ladakh plateau, Srinagar Valley and the plains of Jammu.** The geography and the lay of the land is very suitable to insurgency movement and terrorist activities. The communications being poor and major portion of the land being rugged, military and counter insurgency operations are difficult to undertake.

Historically, there have been multi-racial and multi-cultural ingress into Kashmir since the time of Alexander the Great. Greeks, Persians, Mongols, Mughals, Hindus (including the Sikhs) and Buddhists have inhabited this land. The three geographic regions show the existence of Hindus, Muslims and Buddhist majority (in Jammu, Shrinagar valley and Ladakh, respectively) and different inclinations and opinions.

**Indian pollicy towards Kashmir has had its errors** of judgement strategically **since independence**. In the British era, the British policy of 'divide and rule' and giving lop-sided political advice for keeping own upper hand could not be read clearly by the Indian leaders and hence the manifestation of complications at national as well as international fora. The clause of autonomy resulting into article 370, the raising of the issue in the UN with a hope of UN intervening impartially and agreeing to the cease fire resulting in the 'Cease Fire' line were some of the initial blunders. Today, India controls only approximately 47% of the actual territory that was under the jurisdiction of Maharaja Hari Singh at the time of partition. Even today, our policy shows lack of astute handling.

In the past five decades since independence, fortunes have fluctuated over Kashmir issue due to International pressures. The closer ties that US and Pakistan have had in the period between early sixties and the late eighties, the China-Pakistan nexus, the Indo-Soviet treaty and the Soviet intervention in Afghanistan are



Marathe Pratishthan

more important of the international events that have had telling effects on Kashmir issue. Bilaterally, disintegration of Pakistan in 1971 and birth of Bangla Desh was the most important strategic victory that India has attained. However, that strategic victory could not be fully exploited by us.

Of late, the Afghan factor has been dictating the proceedings in Kashmir, in conjunction with Pakistan. **Pakistan has five power centres which dictate Pakistani policies and philosophy towards Kashmir and India.** The pseudo-Islamic and pan-Islamic alliances have kept the Kashmir pot boiling for the past three decades. Pakistan's crumbling economy and unstable internal political situation are the factors that do not allow Pakistan to take a moderate and rational view towards Kashmir. The nuclearisation of India and Pakistan has complicated the issue further, bringing the two adversaries closer to the threshold of conflict. **Kargil was a 'masterstroke' planned by pakistan way back in 1986-87.** She only attempted the execution after having failed to destabilise India by cutting off Punjab and Siachen.

The Kargil conflict, though brought forward chinks in our vigilance, rendered Pakistan strategically vulnerable at political level and gave tactical victory and strategic advantages to India. Pakistan is getting more and more isolated internationally with loss of support from the US and withdrawal of economic support, albeit partially, from the IMF. **Pakistan is in no state to wage a full fledged war. It can only pursue the policy of 'war by proxy'.** However, that state is likely to cost her dearly due to economic reasons. With 48% of the GDP going towards servicing of the debts, the parallel economy of drugs money going out of control, situation in Pakistan is grim.

**The insurgency in Kashmir, with almost 14 groups keenly active, has been caused due to the reasons like** - non-development and lack of industrial infrastructure, economic backwardness, poverty and unemployment, religious fundamentalism, external support and possible misuse of power by the State Government. **Offer of cease-fire by the Central Govt is a positive step.** However, Huriat opinion being divided, the State level political parties having lost their credibility and effect of Pakistan's instigation have made the possibility of a solution in the near future very bleak. India has very little flexibility left in the matter.

**Breaking up the Huriat, converting the people's opinion through economic development and keeping a stricter check on the terrorism to protect the masses is the most suitable multi-pronged option available.** At the same time, we the common people of India have to keep our eyes and ears open and fight the religious fanaticism that Pakistan in general and the ISI backed groups are attempting to spread across the length and breadth of our country.

We also need to train ourselves to face disastrous situations - war like as well as terrorism based - to minimise the damage. On the other side of the International Border, unless Pakistan stops her own hyping up of Fundamentalist attitudes and resorts to rational moderate views on development of her economy, **there is every chance of further disintegration of Pakistan.** That country may crumble under her own weight of unbalanced policies, economic mismanagement and external factors.

***

### खुषीपत्र

सप्टेंबर २००१ चा हितगुज मिळाला. 'एक गाव एक गणपती' लेख आवडला. तसेच इतर माहितीपर लेखहि आवडले, वाचनीय.

**- प्रकाश गणेश विद्वांस**
(पृ. ६४५) अहमदाबाद

### कोडे

**- मोरेश्वर हरि** (पृ. ४२) गोवा

तो हा आताच निजला
तो हा आताच उठला
दूध प्याला कां सकाळी ?
कां ग उचकी लागली ?

उठताच रडू लागे
स्पर्श आईचाच मागे
त्याला रडवा पाहून
माय जाई भांबावून

राजा रडशील किती ?
काही ठेवावी रे मिती
काय करावे कळेना
तिला उपाय मिळेना.

त्याच्या ओठाचे पाखरु
आवाजते चुरुचुरु
पाहुनिया म्हणे माय
मला मिळाला उपाय

त्याचे जग ते केवढे ?
आता सुटले ग कोडे
गोड बाळ माझा कान्हा
त्याला हवा आहे पान्हा

***


Marathe Pratishthan

# बेजिंग भेट

- **मोहन सदाशिव** (पृ.३६५) खार, मुंबई

*चीनला भारतातून फारसे प्रवासी जात नाहीत. आपले पूर्वविश्वस्त मोहनरावांनी मात्र पुतण्याच्या हाँगकाँग भेटीच्या निमंत्रणाचा फायदा घेऊन 'ड्रॅगन एअर' च्या खास पॅकेज योजनेखाली सहकुटुंब, सहपरिवार चार दिवसांची बेजिंगवारी केली. त्यांच्या बेजिंगभेटीचा वृत्तान्त (पूर्वार्ध) मागील अंकात प्रसिद्ध केला होता. त्या लेखाचा हा उत्तरार्ध. - संपादक*

**दुसऱ्या दिवशी जेवणानंतर** आम्ही **७० कि.मी. घाटातील प्रवास करून चीनच्या भिंतीच्या मुटियान्यु भागात** पोहोचलो. ही भिंत ६००० कि.मी. लांबीची आहे. मंगोलियातून होणाऱ्या आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी ह्या भिंतीची उभारणी शेकडो वर्षे अनेक राजघराण्यांनी केली. इ.स. पूर्वी २०१ ते २०६ ह्या अल्पकाळात राज्य करणाऱ्या किन शी हुआंग ह्या महापराक्रमी राजाने पर्वतावरील अनेक छोट्या छोट्या पहारा चौक्या एकत्र जोडून भिंतीच्या उभारणीस सुरवात केली. ह्या किन राजाने अनेक छोटी छोटी राज्ये एकत्र करुन (सरदार पटेलांप्रमाणे) एक चीन उभा केला. त्याच्या नावावरून देशाला चीन हे नाव पडले. ह्यानंतरच्या राजघराण्यांनी त्याची डागडुजी केली व मिंग राजवटीत (इ.स. १३६८ ते १६४४) आजच्या स्वरूपाची भिंत उभी राहिली.



*चीनची भिंत - उजवीकडे उभे मोहन सदाशिव*


ही भिंत प्रवाशांना चीनचे सर्वात प्रमुख आकर्षण आहे. मानवी इतिहासातील सर्वात मोठा प्रकल्प असे. तिचे सार्थ वर्णन केले जाते. ही भिंत दोन बाजूने पक्की बांधली असून मध्ये १५/२० फुटी पक्का फरशीचा-दगडाचा रस्ता आहे. मजबूत पायऱ्या आहेत. मधून मधून पहाऱ्यासाठीच्या चौक्या आहेत. चीन बेजिंग भेटीचे सार्थक ही भिंत पाहिल्यावर होते. थंडीच्या धुक्याच्या दिवसात तिचे नीट दर्शन होत नाही. थंडीही असह्य असते. हा त्रास आम्हाला झाला नाही.

**तिसरा दिवस**. सकाळी पाऊस पडत होता. हॉटेलमधील ४९ छत्र्या इतर पाहुण्यांनी आधीच घेऊन ठेवल्या होत्या. छत्री विकत घेऊन प्रेक्षणीय स्थळांना भेटी द्याव्या लागणार असा रागरंग दिसत होता. पण आमच्या हुशार गाईडने चिनी (का चित्पावनी?) विचार करून शहरातील टिआनमनऐवजी **शहराबाहेरील समर पॅलेसला** भेटीस नेऊन पावसाचा व छत्रीचा खेळ यशस्वीरित्या उधळून लावला.

पावसामुळे थंड वाटणाऱ्या त्या पॅलेसला समर पॅलेस ऐवजी विंटर पॅलेस नाव अधिक शोभले असते. राजघराण्यातील लोकांना उन्हाळा सुसह्य होण्यासाठी एका प्रचंड तलावाचे खोदकाम बहुधा वेठबिगारी मजुरांकडून करून घेऊन त्या मातीचा प्रचंड डोंगर तयार झाला. त्यावर राजवाड्याच्या अनेक इमारती बांधण्यात आल्या व भरपूर पाण्याच्या तलावात बोटींनी विहाराची सोय करण्यात आली. सरोवरात दुसरे बेट तयार करण्यात येऊन त्यावर जाण्यासाठी सुंदर पूल बांधला गेला. निसर्गरम्य राजवाड्यात तलावाच्या किनाऱ्याने २२७५ फूट / ७५० मीटर लांबीचा जगातील सर्वात लांब लाकडी कॉरिडॉर आहे. जागजागी चौकात छतावर भिंतीवर सुंदर चित्रकला नक्षीकाम वेलबुट्टी आहे. एक संगमरवरी बोट राणी डॉनेजरने बांधून चीनच्या नाविक दलाला इ.स. १८००च्या सुमारास भेट म्हणून दिली. राजवाड्यात विलासी जीवन जगले जाई हे वेगळे सांगावयास नको. येथील राजे अफूच्या आहारी गेले व १९११ मध्ये डॉ. सन्यतसेनने त्यांचा शेवट केला.

जेवणानंतर बेजिंग शहरात फरबिडत सिटीला जाण्यापूर्वी गाईडने आमचा खिसा थोडा हलका करण्यासाठी चिनी देशी औषधाच्या संस्थेला भेट घडवून आणली. आत उत्तम स्वागत होऊन तेथल्या देशी औषधी पद्धतीवर एका डॉक्टरचे भाषण झाले. आपल्या आयुर्वेदाला समांतर त्यांची पद्धती वाटली. तेथे जागतिक कीर्तीचा डॉक्टर असून तो नाडीपरीक्षा करतो असे गाईडने आम्हाला सांगितले. आम्हाला तो युरोपीय वाटला, पण तो चिनी होता असे गाईडने सांगितले. त्याला इंग्रजी येत नव्हते व एक डॉक्टरीण दुभाषीचे काम करत होती. त्याने आमची सर्वांची नाडीपरीक्षा केली व रोगाचे निदान व औषधे सुचविली. मीच फक्त पोटावर उपाय म्हणून ३०० युवानला ६०० गोळ्यांच्या २ बाटल्या घेतल्या व आम्ही बाहेर पडलो.

तेथून आम्ही **फरबिडन सिटी मध्ये प्रवेश** केला. अनेक कमानी खंदक तटबंदी ओलांडली. इथे राजे रहात असत व सामान्य जनांना तेथे प्रवेश नव्हता म्हणून तिला फरबिडन सिटी म्हणतात. ह्या राजवाड्यात मिंग आणि स्विंग घराण्यातील २४ राजांचा निवास होता. ह्याची बाहेरील भिंत १४व्या शतकात बांधली. येथे सहा राजवाडे व ८०० लहान इमारतीमध्ये



*संगमरवरी बोट - समर पॅलेस*



Marathe Pratishthan

९००० चे वर खोल्या आहेत. त्यात राजे राण्या उपराण्या रहात. ह्या वस्तीला पॅलेस म्युझीयम असेही म्हणतात. वाड्याचा विस्तार, हॉल्स ह्यांचा भव्यपणा थक्क करणारा आहे. अनेक कलादालने आहेत. शेवटी राजाने प्रजेची गाऱ्हाणी ऐकून न्याय देण्यासाठी हॉल आहे.

ह्या वाड्यातील मौल्यवान वस्तूंची जपान्यांनी व तैवानच्या लोकांनी लुटालूट केली. प्रचंड चौकाच्या अखेरीला टिआनमन गेट असून तेथील बाल्कनीतून १ ऑक्टोबर १९४९ रोजी माओत्से तुंगने (माओ झेडॉगने) चिनी प्रजासत्ताक राज्याची घोषणा केली. पंडितजींनी १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरून केली त्याची आठवण झाली. ह्या गेटसमोर प्रचंड आकाराचा टिआनमन स्क्वेअर आहे. त्यात १० लाख लोक बसू शकतात. ५ लाख प्रत्यक्ष बसले होते म्हणतात. टिआनमन गेटला माओचा प्रचंड फोटो आहे व चौकाच्या समोरच्या बाजूला डॉ. सन्यतसेनचा तितकाच प्रचंड फोटो आहे. मध्ये मैदानात हुतात्म्यांचे स्मारक, माओचे स्मारक - ज्यात माओचा मृतदेह ठेवला आहे. हे पहावयास आम्हास जमले नाही. चौकाच्या एका बाजूला चीनचे पार्लमेंट (हॉल ऑफ पिपल्स रिपब्लिक ऑफ चायना) आहे. त्याच्या समोरच्या बाजूस कला, विज्ञान, म्युझियम आहे. चौकाचे बाजूच्या रस्त्यांनी वाहनांची प्रचंड वाहतुक असते.

बेजिंगमध्ये फिरताना एक गोष्ट नजरेत भरते. इ.स. २००८ चे ऑलिम्पिक चीनला (बेजिंग) मिळण्यासाठी प्रचार कार्यास जोरदार सुरवात केली आहे. ठिकठिकाणी असे फलक लावलेले आहेत. रस्ता रुंदीकरणाचे कामात बाजूची घरे पाडून तेथे ताबडतोब ट्रक मधून १०/१५ फूट उंचीची झाडे आणून त्यांने खत पाणी घालून रोपण करताना दिसत होते. (चीनला आता २००८ चे ऑलिम्पिक मिळविण्यात यश आले आहे.)

**चवथा दिवस** - सकाळी आम्ही **हुटाँगच्या भेटीसाठी गेलो. बेजिंगचा हा अत्यंत जुना वस्तीचा भाग.** शतकांत मोजता येणारी जुनी घरे, छोटे छोटे रस्ते ह्यांचा हा भाग. नव्या सुधारणामध्ये अजून तग धरून असलेला पण फारसे भवितव्य नसलेला दिसत होता. ह्या भागात सायकल, रिक्षा सजवलेल्या असून दोन जणांना घेऊन गल्ली बोळातून फिरतात.



*चिनी बालकांसमवेत मोहन सदाशिव*

इथे वेगळी गाईड होती. तिचे नाव मे (माझ्या पत्नीने तिला मे फ्लॉवर नाव दिले - लाल फुलाप्रमाणे हसरी.) हाँगकाँगमध्ये गेल्यावर कळले की चिनी लोकांची नावे इतरांना अवघड वाटतात म्हणून ते इंग्रजी नाव स्वीकारतात. आमचा मुख्य गाईड चार्लस (चार्ली) होता. हे स्वीकारलेले नाव होते.

मे ने आम्हाला एका **चिनी कुटुंबात नेले. २६ माणसांच्या एकत्र कुटुंबाच्या २६ खोल्या** होत्या. दुभाषीमार्फत प्रश्नोत्तर चाले. हा जुळवलेला शो वाटत होता. मी चिनी मालकिणीला तुम्ही हाताने न जेवता चॉपस्टिकने का जेवता असा प्रश्न विचारला. तिने पूर्वापार पद्धती असे उत्तर दिले. आमच्या महिला गटाने तिचे स्वयंपाकघर लहान होते ते पाहून घेतले. भांडी कुंडी आवरून झाकून ठेवली असावीत.

ह्या भागात आम्ही प्रचंड नगारा असलेल्या इमारतीला भेट दिली. इ.स. १४२० मध्ये ती बांधली. असंख्य उभ्या पायऱ्या चढून वरती तो नगारा पहावयास मिळतो. बाजूच्या गच्चीवरुन बेजिंगचे विहंगम दृश्य दिसते. समोर बेजिंगच्या जुन्या काळातील ऑब्झर्वेटरीची इमारत आहे. दुरुस्तीमुळे ती आम्हाला पहावयास मिळाली नाही. त्या भागातील एका पार्कमध्ये आम्ही फिरलो तेथे एका नाट्यगृहात चिनी नाटक चालू होते.

सर्व पाहून झाल्यावर आम्ही आमच्या हिस्टन हॉटेलजवळच्या रेस्टॉरंटमध्ये **बेजिंग मधील शेवटचे जेवण** घेतले. साध्या भाताऐवजी भाज्या घालून शिजवलेला भात होता. वांग्याच्या कापांची भाजी, स्वीट कॉर्न सूप म्हणजे तळाशी शिजवलेले मक्याचे दाणे व वरती त्यांचे पाणी. तेथील वाईन (?) छोट्या ग्लासमध्ये दिली ती घेऊन मी व भाऊ उडालो. व्होडकापेक्षा जास्त कडक होती. सिप न करता एका घोटात गाईडने घेऊन दाखवली. मोठ्या भावाची ७/८ दिवसाची सर्दी मात्र झटक्यात पळून गेल्याचे नंतर लक्षात आले. हॉटेलमधून चेकआऊट करून आम्ही बेजिंगच्या विमानतळावर आलो व ७ च्या (प्रत्यक्षात १ तास उशीरा) ड्रॅगन अेअरने हाँगकाँगला ११ वा. पोहचलो. अशा रितीने आमच्या बेजिंग भेटीची यशस्वी सांगता झाली. ***

## चीन मधील लोक

चीनच्या १२७ कोटी लोकसंख्येपैकी ९४ टक्के लोक हॅन ह्या वंशाचे आहेत. मुसलमान पहाडी भागातील आदिवासी, ख्रिश्चन इ. मिळून एकूण ६ टक्के आहेत. त्यामुळे चीनमध्ये भारतासारखे वांशिक, जातीय संघर्ष नाहीत.

कुटुंब नियोजनात शहरात एक मुलाची व ग्रामीण भागात २ मुलांची **सक्ती** आहे. अल्प संख्यांकाना संततिनियमत लागू नाही पण सामाजिक रेट्यापुढे तेही झुकतात.

***



Marathe Pratishthan

# हेडमास्तरांचे अब्राहम लिंकन यांस उत्तर

प्रेषक - **प्रमोद कृष्ण** (पृ.३७६), ठाणे

*अब्राहम लिंकन यांचे हेडमास्तरांस पत्र 'हितगुज'च्या जून २००१ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. त्या पत्राचे हेडमास्तरांनी पाठवलेले उत्तर.*

प्रिय लिंकन,
...तर तुझ्या पत्राप्रमाणे मी तुझ्या मुलाला सांगितलं;
म्हटलं; सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात
नसतात सगळी सत्यनिष्ठ
पण लाखो बदमाषांत
एखादा साधू असतोच
अरे! असं सांगताच तुझा मुलगा
खोऽऽखोऽऽ हसत सुटला
म्हणाला: कुठल्या युगात वावरता मास्तर?
आज बाबांनी तरी असं लिहिलं असतं का?
बाबांचं एक मात्र खरं
एखादा साधू शोधण्यासाठी
लाख बदमाष डोळ्यांखालून घालावेच लागतात
...पण मास्तर! लाख बदमाष पाहिल्यावर
आपले डोळे आणि डोकेच बदमाष झालेत
तर मग एखादा साधू कसा हो ओळखावा?

...मग मी तुझ्या पत्रातला
दुसरा मुद्दा त्याला सांगितला;
स्वार्थी राजकारण्यांसोबत
आयुष्य समर्पित करणारेही असतातच
अरे! यावेळी तर तो पूर्वीपेक्षाही जोरात हसला
म्हणाला : मास्तर! समर्पित म्हणजे स्वअर्पित का हो?

...मग मी त्याला म्हटलं:
टपलेल्या वैऱ्याप्रमाणे
जपणारे मित्रही असतातच
तर त्याने मलाच प्रतिप्रश्न केला
म्हणाला: टपलेला वैरी आणि टपलेला मित्र
यांच्यात जास्त धोकादायक कोण?

...मग मी पुढच्या मुद्याला हात घातला
म्हटलं: घामाचा छदाम मौल्यवान
बेईमानीचे घबाड काय कामाचे?
तो म्हणाला: मास्तर! आयुष्यभर घाम गाळून
फक्त छदामच हाताला लागायचे
घबाड मिळवायचे असेल तर
ही घामाची थिअरी बाजूला ठेवली पाहिजे
शिवाय त्यानं विचारलं : मास्तर!
नॉन ग्रॅन्टच्या शाळेवर
वर्षानुवर्षे घाम गाळून

हाती किती छदाम पडतात हो?
...मग मी विषय बदलून
तुझा आणखी एक विचार
त्याच्यासमोर मांडला;
पराभव धीरानं अन् विजय संयमानं
पचवला पाहिजे
तो म्हणाला : मास्तर! अनेकदा विजय मिळवला
तरच एखादा पराभव पचवता येतो
तात्पर्य काय? ..अनेकदा विजय मिळवणं महत्त्वाचं

एक दिवस मी त्याला म्हटलं;
गुंडांना भीत जाऊ नकोस
तो म्हणाला: मास्तर!
दहा-पाच गुंडांसमोर
ही गोष्ट सांगायची हिम्मत कराल?

...मग मी लवकर मुद्दा बदलला
म्हटलं : निसर्गाचं आणि ग्रंथभांडारांचं
अद्भुत वैभव तू पाहिलं आहेस का?
तो म्हणाला: म्हणजे नेमकं काय?
मी म्हटलं: ... म्हणजे पक्ष्यांची अस्मानभरारी
सोनेरी उन्हातले भ्रमर, हिरवे डोंगर
चिमुकली फुलं... वगैरे वगैरे
तो म्हणाला: थोडक्यात टी.व्ही. वरचं सगळं सगळं!..
शिवाय पुढे तो असंही म्हणाला : मास्तर!
खरं अद्भुत वैभव तुम्हाला तरी माहीत आहे का?
सांगू? मी म्हटलं सांग (लिंकन, हल्ली विद्यार्थ्यांच्या
मतांनाही महत्त्व असतं बरं!)
....तर त्यानं सांगितलं
''लावण्यवतींचा लालस जेथ निवास
मदिरेत माणकापरी तरारे फेस''
मी विचारले: बाबा रे! ...हे सगळं कुठं असत?
तो म्हणाला: मास्तर! एखादा फेमस बार
उत्तर रात्री कधी पाहिलाच नाही का?
किंवा मायकल जॅक्सन, बिल गेट ही नावंही
कधी ऐकलीच नाहीत का?
शिवाय तो असंही म्हणाला :
हे सर्व वास्तव वैभव अनुभवल्यावर
वरून शिवाय पुस्तकं वगैरे वाचायची
म्हणजे ती मग नेमकी कशासाठी?

मग ती भीतभीतच म्हटलं :
आपल्या कल्पनांवर, आपल्या विचारांवर
दृढ विश्वास हवा माणसाचा
तर तो उत्तरला : बाबांना कळवा
की तुमच्या मुलाचा दृढच विश्वास आहे स्वत:वर
फक्त त्याच्या कल्पना, त्याचे विचार
त्याच्या बापापेक्षा वेगळे आहेत

...आणि मग लिंकन!
एक दिवस मी त्याला सांगणारच होतो
की त्यानं टग्यांना अद्दल घडवावी
तर तुझा मुलगा त्या दिवशी
टग्यांच्याच टोळक्यात माझ्याकडे आला
अन् गालात हसत म्हणाला :
मास्तर! आज काही संदेश?
मी म्हटलं : आज काही नाही.

...मग खूप दिवसांनी मी त्याला गाठलं;
म्हटलं : ऐकावं जनाचं;
पण मनाला सत्याची चाळणी असू द्यावी
तो ताडकन् म्हणाला : सत्याला फक्त
विजयाची चाळणी असते मास्तर!
जे त्यात उरतं ते सगळंच सत्य ठरतं!!

...पुन्हा एकदा मी त्याला सांगून पाहिलं
म्हटलं : उरातलं दु:ख दाबून हसत रहावं



Marathe Pratishthan

अश्रु ढाळण्यात लाज कसली?
तर तो उत्तरला :
उरातलं दु:ख दाबून शिवाय वर हसावं
शिवाय वरून आसू सुद्धा ढाळावेत...
बाबांना सांगा की हे लॉजिकमध्ये बसत नाही
उलट इतरांच्या आसवांवर हसता आलं
तर इथे हसण्याची संधी आहे म्हणावं

...मग मी त्याला शेवटचं सांगून पाहिलं :
ताकद आणि अक्कल विकून कमाल कमाई कर
हृदय आणि आत्मा विकू नकोस
तर यावरही तो म्हणाला :
खरेदी-विक्रीच्या बाजारात
नफा कमविण्याची ईर्षा बाळगणाऱ्याने
आत्म्याची भाषा बोलू नये

शिवाय ज्यांनी आत्मे विकले नाहीत
त्यांना महात्मे बनवून लोक विकतातच की!
मग उद्या आपल्यानंतर आपली विक्री होण्यापेक्षा
आज स्वत:ला विकणे काय वाईट?

...मग बऱ्याच दिवसांनंतर
मी त्याला म्हटलं :
तुच्छतावाद्यांना तुच्छ मानावे
तो म्हणाला : मी सगळ्यांनाच तुच्छ मानतो
त्यात शेवटी तुच्छतावादीही येतातच

...पुन्हा एकदा मी त्याला म्हटलं :
सत्य आणि न्यायासाठी पाय रोवून लढ
तर तो म्हणाला : सत्य आणि न्यायासाठी
पाय रोवून लढण्याचा काळ
भूतकाळात जमा झाला मास्तर!
आता सत्य आणि न्यायावर पाय देऊन लढण्याचे
दिवस आले आहेत.
मास्तर! बदल हे स्वीकारलेच पाहिजेत

...मग मी त्याला अगदीच शेवटचं सांगितलं :
तुला मी ममतेनं वागवीन; पण तुझे लाड करणार नाही
तो म्हणाला : जा उडत
मी म्हटलं : हा उद्धटपणा आहे
तो म्हणाला : मास्तर! मी तुम्हाला माफ करतो;
पण तुम्ही खूप बोलता
आता जमेल तर एक करा
माझ्या वडिलांच्या पत्राशेजारीच
शाळेशाळेच्या भिंतीवर
माझेही एक पत्र चिकटवा
म्हणजे आपल्या मुलाचे कसे पोलाद झाले आहे
हे तरी बाबांना कळेल
माझा बाप -
भलताच भाबडा माणूस होता तो

...लिंकन! तुझ्या मुलाने तर मला
माफ केलेच आहे
तुही माफ करशील ही अपेक्षा.

- हेडमास्तर

(हेमंत सुदामराव खडके, यवतमाळ)

***

**Self-Improvement**

✣ Acquisition and possession of wealth is no measure of the quantum of one's happiness. Happiness is measured by the tranquility of one's own mind.

**क्षणभंगूर क्षण**

**- श्रीनिवास नारायण** (पृ. ६), पुरळ

सत्याचा वास आहे
स्वप्नांचा भास आहे
शांतीचा श्वास आहे
निस्वार्थाचा ध्यास आहे ।।

पावित्र्याची जोड आहे
समतेचा मार्ग आहे
कर्म आणि ज्ञानाचा
भक्तीचा नाद आहे ।।

जे जे हवे ते ते आहे
स्वर्ग तेथे नटला आहे
सर्वांच्या कल्याणा
हर येथे झटला आहे ।।

समाजसेवा नाव त्याचे
नवा पंथ तोच आहे
वास्तवास असे सुख
क्षण तो एक आहे ।।

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी.*

*बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक (विवाह सहाय्य : क्र. ३/२००१-मनीष काशिनाथ दातार आणि क्र. १०/२००१-मिलिंद मधुकर जोशी यांचा विवाह झाल्याचे सांगलीच्या म. प्र. वधुवर माहिती केंद्राचे संचालक श्री. विठ्ठल महादेव मराठे यांनी कळवले आहे.)*

**क्र. १४/२००१ वधू** अश्विनी प्रकाश विद्वांस, कोकणस्थ, गोत्र-कपि, जन्म - २९.१.१९७७, उंची ५'-३ १/२'', एम्.बी.ए. (गुजरात युनि.), R.B.I. अहमदाबादमध्ये नोकरी, चष्मा आहे, लेन्स लावते, प्रकृति निकोप, सडपातळ बांधा, ब्लड ग्रुप-बी पॉझिटिव्ह, **अपेक्षा** - इंजिनिअर, डॉक्टर, उच्चशिक्षित, मा. प्रा. रु. १०,००० चे वर, **संपर्क** - प्रकाश गणेश विद्वांस (पृ.६४५), 'शिवम', म्युनिसिपल स्कूल नं. ८ समोर, मणिआसा सोसायटी, मणिनगर (पूर्व), अहमदाबाद - ३८० ००८. फोन : २७७९११२. (मागील दोन अंकात उंची ४'-३ १/२'' आणि खाजगी कंपनीत नोकरी असे छापले होते. सप्टेंबर अंकानंतर वडिलांनी कळवलेली दुरुस्त माहिती)

**क्र. २२/२००१ वधू** कु. गंधाली गोविंद मराठे, जन्म - २२.०६.१९८०, कोकणस्थ ब्राह्मण, कपी गोत्री. शिक्षण - आर्टस् बी.ए. तृतीय वर्ष चालू, उंची - ५'-२'', मध्यम जाडी,



Marathi Pratishthan

गोरा वर्ण, मुलीला आई वडील व एक भाऊ असून तो तंत्रनिकेतन दुसऱ्या वर्षाला आहे. वडील सरकारी प्रा. शिक्षक (निवृत्त), स्वत:चे घर आहे व थोडीशी बागायती. **अपेक्षा** - २६ ते २८ पर्यंत वय, स्वत:चे घर, आई-वडील, सरकारी नोकरी, इंजिनिअर, ऑफिसर, गोरा, निर्व्यसनी, गोवा किंवा बेळगाव, सांगली, कोल्हापूर. **संपर्क** - गोविंद नारायण मराठे, डॉमनिक प्लाझा, २रा मजला, मु.पो. तिस्क, उसगांव, फोंडा रोड, गोवा - ४०३ ४०६.

**क्र. २३/२००१ वर** संजय अरविंद बागूल, गोत्र-वासिष्ठ, जन्म १७.३.१९७०, उंची - ५'-४ १/२'', H.S.C., NCVT (Air conditioning & Refrigeration), सेंट्रल रेल्वेत नोकरी - A.C. Coaching, पगार ६००० अधिक, व्यावसायिक प्राप्ती, वडील नाहीत, आई आहे. मोठा भाऊ विवाहित, बहीण नाही. **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - श्रीमती आशा अरविंद बागूल, जोशी वाडा, टिळक चौक, कल्याण. दूरध्वनी - २०८२६६. (श्रीनिवास भालचंद्र, पृ.१६३ यांचे मार्फत)

**क्र. २४/२००१ वर** मंदार सुरेश खांबेटे, कोकणस्थ, गोरा, गोत्र-कपि, जन्म - १८.११.१९७३, उंची - ५'-११'', Blood Group - 'O' Positive, शिक्षण - १२वी कॉमर्स पास, आई वडील आहेत, व एक लहान भाऊ शिकत आहे, आईने Voluntary Retirement घेतली आहे, वडील Reserve Bank of India मध्ये नोकरीला आहेत, मुलाचा व्यवसाय तळेगांव (दाभाडे) जि. पुणे येथे स्वत:चे General Stores आहे, मासिक प्राप्ती - रु. ८०००, तळेगांवला बंगला आहे, तळेगावला वस्ती वाढत असल्याने व्यवसाय अजून वाढेल. **अपेक्षा** - मुलगी किमान एस.एस.सी. पास हवी व नोकरी नको, अनुरूप. **संपर्क** - श्री. सुरेश नारायण खांबेटे, A-१३, गोकुळ निवास, कोटणीस पथ, माहीम, मुंबई - ४०० ०१६. फोन - ४४६८६७७.

**क्र. २५/२००१ वधू** अनिता अशोक फडके, वय - २७ वर्षे, उंची ५ फूट, रंग - गोरा, शिक्षण - B.A., २ वर्षाचा कॉम्प्युटर कोर्स, Self Employed (कॉम्प्युटर प्रशिक्षण व कॉम्प्युटर संबंधीत कामे), आई वडील व धाकटी बहीण आहे, **अपेक्षा** - कोकणस्थ, अनुरूप, नोकरी/व्यवसाय, **पत्रिका बघायची आहे. संपर्क** - ९५२५१-८६०७६६. (प्रतिष्ठानचे सभासद उदय दत्तात्रय, पृ.३२६, यांचेमार्फत.)

**क्र. २६/२००१ वधू** कविता वसंतराव चोळकर, गोत्र-अत्रि, कोकणस्थ ब्राह्मण, जन्म - ५.१२.१९७९, रंग - सावळा, प्रकृति उत्तम, उंची - ५'-००'', चष्मा आहे, मंगळ नाही, रक्तगट - A Positive, शिक्षण - B.Com. (Gold Medalist in Marketing), M. S. University of Baroda, M.Com. Final Year Study, D.B.M. Diploma in Business Management चालू, संगीताची आवड, नोकरी शिक्षण पूर्ण झाल्यावर करावयाची आहे, वडील - कॅनरा बँकेत ऑफिसर, आई - घरकाम, एक लहान भाऊ - शिक्षण चालू, **अपेक्षा** - कोकणस्थ ब्राह्मण, उच्च पदवीधर, चांगली नोकरी, व्यवसाय, कुटुंब वत्सल घर असावे. **संपर्क** - वसंत भालचंद्र चोळकर, ५-B, बेला अपार्टमेंटस्, मनीषा सोसायटीमागे, वासना रोड, वडोदरा - ३९० ०१५. फोन : ३३४४०३.

**क्र. २७/२००१ वर** संतोष मधुकर ओक, जन्म - १३.७.१९६६, कोकणस्थ, गोत्र - वासिष्ठ, उंची - ५'-१०'', सडपातळ, गोरा, रक्तगट - A+, व्यवसाय - कॉम्प्युटर क्लास, सायबर कॅफे (स्वत:ची प्रशस्त जागा), मासिक उत्पन्न - रु. १२,००० ते रु. १५,०००, वडील - सेवा निवृत्त. आई - गृहिणी. **अपेक्षा** - नोकरी करणारी किंवा कंप्युटर शिकण्याची आवड. **संपर्क** - सौ. माधुरी ओक, ३-शिव प्रसाद, डॉ. राजेंद्र पथ, टिळक नगर, मानव कल्याण केंद्राजवळ, डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१ २०१. घरचा फोन - (९५२५१) ४३०२६६. (राजा मराठे, मालाड, मुंबई यांचे मार्फत)

**क्र. २८/२००१ वर** समीर मधुकर ओक, जन्म - ६.१०.१९६७, कोकणस्थ, गोत्र-वासिष्ठ, उंची - ५'-१०'', बांधेसुद - गोरा, शिक्षण - B.Com., व्यवसाय - स्वत:च्या जागेत कॉम्प्युटर क्लास तसेच टाईपिंग/शॉर्टहॅन्डचे क्लासेस. मासिक उत्पन्न - रु. १५००० चे आसपास, वडील - सेवा निवृत्त, आई - गृहिणी, मोठी बहीण विवाहित, एक भाऊ अविवाहित. **अपेक्षा** - कॉम्प्युटरची आवड, नोकरी असली तरी चालेल. **संपर्क** - सौ. माधुरी ओक, ३-शिव प्रसाद, डॉ. राजेंद्र पथ, टिळक नगर, मानव कल्याण केंद्राजवळ, डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१ २०१. घरचा फोन - (९५२५१) ४३०२६६. (राजा मराठे, मालाड, मुंबई यांचे मार्फत)

**क्र. २९/२००१ वर** संतोष अरविंद दातीर, को.ब्रा., गोत्र-काश्यप, जन्म - १८.५.१९६८, उंची ५'-३'', शरीर-बांधा - सुदृढ-निकोप, चष्मा नाही, F.Y.B.A. व्यवसाय - वडिलोपार्जित धंदा - बडोदा (गुजरात) मधील प्रतिष्ठित सायकल व्यापारी, मा.प्रा. रु. ६-७ हजार, बडोदा येथेच स्थावर २ घरे, घरी आई-वडील, मोठा भाऊ विवाहित, बहीण नाही. **संपर्क** - अरविंद कमलाकर दातीर, G.P.O. जवळ, दातीर सायकल स्टोर्स, रावपुरा, बडोदा - ३९० ००१. फोन : ४१४६७६. (प्रभाकर त्रिंबक विद्वांस, बडोदा, यांचेमार्फत)

**क्र. ३०/२००१ वधू** निकेता विजय दातीर, को.ब्रा., गोत्र-काश्यप, जन्म - ७.१०.१९७८ उंची - ५'-१'', बांधा - मध्यम, गहूवर्ण, चष्मा

### खुषीपत्र

२००१ सप्टेंबरचा हितगुज मिळाला. एका वर्षात दोन सुवर्णपदके मिळवणाऱ्या कु. प्रियदर्शनी मराठे हिच्या विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करावा तेवढा थोडाच आहे. तिचे अभिनंदन. डॉ. रमा मराठे यांचे आरोग्यविषयक लेख नेहमी 'पुढारी' मधून वाचायला मिळतात. त्या व डॉ. रविकिरण मराठे प्रतिष्ठानशी संलग्न आहेत हे बघून आनंद झाला.

**- विठ्ठल महादेव** (पृ. २३५)
विश्रामबाग, सांगली.

Marathe Pratishthan

नाही. शिक्षण - B.Sc (Home) इंग्रजी माध्यम, कॉम्प्युटर कोर्स, Interior Design - NIFD मधून डिप्लोमा, आई SBI मध्ये नोकरी, वडील खाजगी कंपनीतून निवृत्त, मोठी बहीण विवाहित. बडोद्यास स्वत:चे घर, गाडी वगैरे. **अपेक्षा -** सुस्थितीतील, अनुरूप, पदवीधर, चांगली नोकरी असलेला. **संपर्क -** विजय कमलाकर दातीर, १०, भावेशनगर सोसायटी, अरुणाचल सोसायटी रोड, सुभानपुरा, बडोदा - ३९० ०२३. फोन : ३९४२५१.(प्रभाकर त्रिंबक विद्वांस, बडोदा, यांचेमार्फत)

**क्र. ३१/२००१ वधू** प्रज्ञा अरुण मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - २३.४.१९७३, शिक्षण - BE Civil 1st class M. S. University Baroda. Diploma in Information Systems Management (Aptech). Diploma in Autocad. संगीत विशारद, डिझाईन इंजिनियर म्हणून बडोदा येथे नोकरी. उंची - ५'-१'', रंग - गोरा, सडपातळ, दिसण्यात स्मार्ट, चष्मा नाही, मुलीस आई-वडील, १ मोठी बहीण (विवाहित), वडील औद्योगिक न्यायालयातून न्यायाधीश पदावरून निवृत्त, सध्या व्यवसाय, आई - राष्ट्रीयवृत्त बँकेतून स्वेच्छा निवृत्त, बडोदा येथे स्वत:चे घर. **अपेक्षा -** इंजिनियर, उच्चशिक्षित, शाकाहारी, संस्कारी, शक्यतो उंच असावा. (५'-६'' ते ५'-९'' पर्यंत) **संपर्क -** श्री. अरुण भिकाजी मराठे, 'अभिराम', ५ नीलकंठ पार्क सोसायटी, किरणनगर सोसायटी जवळ, मांजलपूर, बडोदा - ३९० ०११. फोन : ०२६५-६४२८८७.

**क्र. ३२/२००१ वधू** अमृता प्रकाश खांबेटे को.ब्रा., जन्म -३१.८.१९७५, गौर वर्ण, B+ve. उंची ५'-६'', बी.कॉम., सी. एस. फायनल परीक्षा देणे चालू. आवड व छंद - बागकाम, वाचन, संगीत, बहीण एक विवाहित, भाऊ नाही, वडील इंजिनिअर, स्वतंत्र व्यवसाय, आई डॉक्टर M.B.B.S. नोकरी वैद्यकीय अधिकारी, **अपेक्षा** अनुरूप. **संपर्क -** प्रकाश अ. खांबेटे, 'छाया प्रकाश', १३२, जिल्हा पेठ, जळगांव - ४२५ ००१. (फोन : ०२५७/२२३३६८) ***

# तोडगा

***(आकाशवाणी सांगली केंद्रावरून प्रसारित झालेली कथा)***

**- विठ्ठल महादेव** (पृ. २३५), विश्रामबाग, सांगली (फोन : ३०००७२)

'यह चीज बडी है मस्त मस्त, यह चीज बडी है मस्त', सकाळीच रंगोलीवर लागलेल्या गाण्याच्या ओळी गुणगुणत रामभाऊ गॅसच्या बर्नरची छिद्रे साफ करण्यात तल्लीन झाले होते. बऱ्याच दिवसात बर्नर साफ न केल्यामुळे त्यात काजळी साठली होती. आजच्या रविवारी ही काजळी काढून स्वच्छ बर्नर सौ. च्या हवाली करून तिच्या कडून चहा घेताघेता वाहवा मिळवायची असा त्यांनी निश्चय केला होता.

विद्या अपार्टमेंटमध्ये तिसऱ्या मजल्यावर राहणारे रामभाऊ कोणत्या तरी सरकारी खात्यात इंजिनियर होते. घरांत ते व त्यांची पत्नी मीना दोघे. पस्तीशीच्या आसपासचे रामभाऊ व तिशीच्या आसपासती मीना. दोघेजण आनंदात होते. व्यवसायाने इंजिनियर, वयाने तरुण व अंगात इतर- नवऱ्यात आढळणारा कंटाळा नसल्याने घरातील स्वच्छता, टापटीप इ. रामभाऊ बघत असत. असे करण्याने आपण ॲक्टीव्ह राहतो व वेळही चांगला जातो असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे घरातील वस्तूंची किरकोळ दुरुस्ती ते स्वत:च करीत असत.

बर्नरची भोके बारीक तारेने साफ करायची, ती सर्व साफ झाली की लहान हातोडीने अगदी हळूच त्यावर ठक ठक करीत ठोकायचे. सर्व भोके साफ झाली की बर्नर प्रथम पाण्याने धुवायचा व नंतर रॉकेलमधे बुडवायचा. ही सर्व कामे करून बर्नर किचनमध्ये नेऊन ट्रायल द्यावयाची हे सर्व करण्यात आज दोन तास तरी खर्च पडणार होते.

तोंडाने चालू असलेल्या 'यह चीज बडी है मस्त मस्त' या गाण्याच्या ओळी कधी गेल्या व आती क्या खंडाला या ओळी कधी आल्या ते त्यांना समजले नव्हते. आपल्या कामात तल्लीन असतानाच मीना जवळ येऊन आपल्या कानाशी वाकते आहे हे त्यांच्या लक्षात आले. आपल्या तोंडच्या गाण्याला ती लाडात येवून प्रतिसाद देत आहे असा उगीचच समज करून घेऊन आपला चेहरा त्या दिशेने वर केला तोच 'अहो असं काय करताय ? बाहेर जोशी वहिनी आल्यात, आणि गाणं तरी किती मोठ्याने म्हणताय, त्या काय म्हणतील ?' असे म्हणून मीना बाहेर गेली.

मीनाचा इशारा रामभाऊंच्या लक्षात आला. बर तर बर, मीना चटकन बाहेर गेली ते ! आपण रंगात येऊन काहीतरी करून बसलो असतो आणि त्याचे प्रिंटस गालावर उमटले असते असे मनांत येतांच त्यांचे गुणगुणणे बंद झाले. बर्नरवरील ठकठकही थांबली.

'जोशी वहिनी, बसा हं जरा, आत बर्नर रिपेरी चालू आहे ती संपली की मी चहा करते' अस म्हणून मीनाने जोशीवहिनींचे स्वागत केले. 'अय्या, बर्नर म्हणजे गॅसचाच बर्नर ना ? काय योगायोग म्हणायचा. मीही त्यासाठीच आले होते. सकाळपासून आमचा गॅसच नीट पेटत नाही. काका घरी असतील तर आमच्या बर्नरकडे जरा बघता का म्हणून विचारायलाच मी आले होते. काकाही नेमके बर्नरमधेच गुंतलेत. आमचे बर्नर इकडे आणून देवू की काका तिकडे येतील, जरा विचारता का', असे म्हणून जोशीबाई सरळ आतल्या खोलीत डोकावल्या.

शेजारच्या जोशीबाईंचा मधुर आवाज, त्या उच्चारीत असलेले अय्या, योगायोग, काका असे लडीवाळ शब्द रामभाऊ आतून कान देवून ऐकत होते. ते जर आपल्या बर्नरमधे गुंतले नसते तर जोशीबाईंचे बर्नर साफ करून देण्यासाठी आनंदाने त्यांच्या घरी गेले असते. बाईंचा गौर वर्ण, मधाळ बोलणे, हसताना त्यांच्या गालाला पडणारी खळी, मान इकडे तिकडे करताना त्यांच्या शोल्डरकट केसांची होणारी गोड हालचाल आणि त्यांच्या हातचा गोड चहा या साऱ्यांची लज्जत काही औरच होती. पण आज ती संधी हुकली होती. जोशीबाई आतल्या खोलीत डोकावल्या तेव्हा, 'या की वहिनी या', असे म्हणत रामभाऊंनी



Marathe Pratishthan

जवळचा टॉवेल आपल्या मांड्यावर ओढून घेतला आणि 'जोशी वहिनी तुमचे बर्नर इकडेच पाठवून द्या नाहीतरी मी पसारा मांडलेलाच आहे. तासाभरात करून देतो साफ' असे म्हणत जोशीवहिनीचे काम त्यांनी स्वीकारले.

'काका, आज रविवार ना, म्हणून तुम्हाला त्रास हं रविवारी आमच्या मेकॅनीकच दुकान बंद असत. नाहीतर फोन केला की लगेच येऊन पांच मिनिटात रिपेअर करून गेला असता' जोशी वहिनीनी औपचारिकता पूर्ण केली.

जोशी वहिनी आपल्याकडे असलेल्या फोनचं कौतुक सांगतात की त्यांच्या मेकॅनिकने पांच मिनिटात रिपेअर केला असता व मला मात्र तासभर लागतो असे त्यांना सुचवायचे आहे याचा रामाभाऊंना विचार पडला. काम करून घ्यायचे ते घ्यायचे वर हा मानभावीपणा. मीनाला पण ते रुचले नाही. तिच्या चेहऱ्यावर ते स्पष्ट दिसले.

'त्रास कसला आलाय त्यांत जोशी वहिनी? एवी तेवी हात काळे झालेच आहेत ना आणि मेकॅनिकचं काय सांगू नका. घाई गडबडीत काहीतरी करून जातात. नीट झाले तर ठीक, नाहीतर पुन्हा येरे माझ्या मागल्या' असे म्हणून मीनाने जमेल तेवढी परतफेडी केली व जोशी वहिनींना निरोप दिला.

जोशी वहिनी बाहेर पडल्या. मीना रामभाऊंच्या जवळ येऊन बसली. त्यामुळे काम पूर्ण करण्यात रामभाऊंना हुरुप आला. तासाभरात बर्नर साफ झाला. निळ्या ज्योतीच्या गॅसवरचा गरमागरम चहा पीत रविवार मजेत घालवायचा ठरवून रामभाऊ टी. व्ही. पुढे बसले.

दिवसे दिवस रामभाऊंच्या ओळखी वाढत गेल्या. मीना महिला मंडळ, भिशी मंडळ इ. ची ॲक्टीव्ह मेबर असल्यामुळे जागोजागी ''मीनाताई, अगदी लकी आहात हं तुम्ही. तुम्हाला हुशार मिस्टर मिळाले. नळाचे काम असो, विजेची दुरुस्ती असो की अन्य काही असो अगदी घर बसल्या होतात हं तुमची कामे. नाहीतर आमचे हे. सर्वात हुशार आहेत, पण हातात साधा स्क्रू ड्रायव्हर धरता येत नाही.

शेजारचे उल्हासराव तर विचारू नका. नळाचा वॉशर गेला दोन दिवस पाणी धो धो वाहत होते पण साधा वॉशर बसवता आला नाही. शेवटी प्लंबर जेव्हा आला तेव्हाच त्यांचा नळ दुरुस्त झाला. या आणि अशा प्रकारचे आपल्या नवऱ्याबद्दलचे शेरे ऐकताना मीनाच्या अंगावर मूठभर मांस चढले नाही तरच नवल. ऑफीसातून घरी आल्या नंतर चहा घेता घेता मीनाच्या तोंडून ''आज किनई मंडळात तुमचा विषय निघाला होता. परवा तुम्ही मंडळातले दिवे गेले त्यावेळी चालू करून दिले त्याबद्दल तुमचे अगदी थॅंक्स माना असे मला सांगितले आहे हं सगळ्याजणींनी. नाहीतर वायरमन येवून फॉल्ट काढेपर्यंत आमच्या कार्यक्रमावर पाणी पडले असते.'' दिवे गेले त्यावेळी फळाची आशा न धरता तू काम कर या प्रमाणे जरी रामभाऊंनी दिवे चालू केले होते तरी आता मंडळाच्या बायकांच्या तोंडून आपले कौतुक ऐकून रामभाऊ सुखावले.

'अगदी थॅंक्स म्हणजे तू काय करणार आहेस ते आत्ताच होऊन जाऊ दे' असे म्हणत रामभाऊंनी मीनाकडे मिस्कील नजर टाकली.

रामभाऊ म्हणजे अपार्टमेंट मधील हुरहन्नर मित्र असा त्यांच्यावर शिक्काच बसला होता. त्यांचे कौतुक केले की अपार्टमेंट मधील साऱ्यांची बारीक सारीक कामे होऊन जात. हळूहळू आपल्या स्वभावाचा गैरफायदा घेतला जात आहे हे त्यांच्या लक्षात आले. साधे टेबल फॅनला तेल घालणे असले तरी 'काका तुम्हाला वेळ आहे का? आमचा किनई टेबल फॅन आहे ना, सारखा एका बाजूला वळून बसतो बघा' असे म्हणून एकादी शेजारीण टेबल फॅन रामभाऊंच्या बिऱ्हाडी आणून आपटू लागली. भिडेपोटी रामभाऊ त्यांचा फॅन दुरुस्त करून देवू लागले. त्याच वेळी रामभाऊंच्या लक्षात आले की आपल्याकडे फॅन आणून देवून त्यांचे नवरे मात्र टी. व्ही. समोर बसून कार्यक्रमाची मौज लुटतात.

एकदा तर कमालच झाली. रविवारी सकाळी दारावर थाप पडली व 'मीना वहिनी, मीना वहिनी' करीत त्याच मजल्या वरची नलू आत घुसली.

'वहिनी, काका आहेत का घरात?

'हो आहेत की, काय काम आहे?

'वहिनी आमचे शिवायचे मशीन सकाळपासून रुसले आहे. दोराच तुटतो आहे सारखा'

'मग तू बॉबीनचा स्क्रू ॲडजेस्ट कर.'

''सगळं करून बघितलं, पण काही जमत नाही, मला तर आज रात्री गावाला जायचय. नवीन ब्लाऊज शिवून व्हायचाय. परवा तुम्ही म्हणालात ना की काकांनी तुमचे संपूर्ण मशीन ओव्हर ऑल केले म्हणून. मग जरा प्लीज काकांना सांगा की आपमचे मशीन बघायला. तुमचे संबंध मशीन जर ओव्हर ऑल करतात तर आमचे मशीन म्हणजे अगदी डाव्या हातचा मळ! हो की नाही हो काका?'' असे म्हणून नलूने काकांकडे बघितले. नवऱ्याची एवढी स्तुती एकल्यावर मीनाने रामभाऊंना बघा हो जरा नलुंचे मशीन ॲडजेस्ट होते का? असे सांगितले नसते तरच नवल ती नलुला एवढे सांगून थांबली नाही तर 'नलू तू हो पुढे, पाच मिनिटात हे येतील तिकडे त्यात काय एवढ?' असे म्हणून तिने नलूची पाठवणी केली.

मीनाने हे काम अंगावर घेतल्याने रामभाऊंना तिकडे जाणे भाग पडले. पिशवीमधे चार पाने, पक्कड, स्क्रूड्रायव्हर इ. आयुधे घेऊन रामभाऊ नलूच्या बिऱ्हाडाची बेल वाजवत असतानाच 'त्यांना कशाला इकडे बोलावलेस? मशीनच तिकडे नेऊन टाकले असते तर आपण तास दोन तास शॉपींग करून बाहेरच लंच घेऊन रविवार एंजॉय केला असता. आता आली का पंचाईत? मशीन दुरुस्त होईपर्यंत त्यांच्यासमोर बसून रहावे लागेल. असू दे. नाईलाज आहे. बघू या काही मार्ग निघतो का?' असे नलूच्या नवऱ्याचे शब्द कानावर पडले.

बेलचा आवाज ऐकून नलूने दार उघडले व 'काका, या की या' मशीन बाहेरच आणून ठेवले आहे. म्हणजे तुमचा उगीच खोळंबा नको. तुम्हाला उगीचच रविवारचा त्रास' असे म्हणून रामभाऊंना आंत घेतले.

'चालायचय, त्यात काय एवढं?' असे म्हणत रामभाऊंनी मशीनची वादी सुटी केली व गड्डा उलटा केला. रामभाऊंनी एकेका भागाची तपासणी चालवली होती आणि इकडे नलूच्या नवऱ्याचा जीव खालीवर होत होता. त्याला



Marathi Pratishthan

बायकोबरोबर बाहेर जाऊन रविवार एंजॉय करायचा होता ना.

'त्याचे काय आहे रामभाऊ, आम्हाला एका नातेवाईकाला भेटायला दवाखान्यात जायचे आहे. त्यांचे नुकतेच ऑपरेशन झाले आहे. आम्हाला रविवार शिवाय परत वेळ मिळत नाही. नाहीतर अस करुया का की, मशीन तुमच्या व्हरांड्यात नेऊन ठेवू. तुम्ही काय रिपेअरी करायची ती करा आज संध्याकाळी पर्यंत झाली तरी चालेल.' असे म्हणून नलूच्या नवऱ्याने अगतिकतेने रामभाऊंकडे बघितल्यासारखे केले. नलूचा व तिच्या नवऱ्याचा कावा रामभाऊंनी ओळखला 'म्हणे नातेवाईकाला भेटायला जायचय खुशाल जा म्हणाव, करा करा रविवार एन्जॉय करा. मी माझा रविवार घालवून मशीन नीट करीत बसतो. चांगली अद्दल घडवतो.' असे मनांत म्हणत 'तुम्हाला आता दवाखान्यात जायचं आहे तेव्हा मशीन आमच्या व्हरांड्यात नेऊन ठेवा की. मला अवजड सामान उचलायच नाही अस डॉक्टरांनी सांगितल आहे. तुम्ही दवाखान्यात जाऊन सावकाश या' असे म्हणून रामभाऊंनी मशीन आपल्या घरी आणायची परवानगी दिली.

मशीन हलवायची परवानगी मिळाल्याबरोबर एवढे अवजड मशीन नलूने व तिच्या नवऱ्याने दोघांनी धरून झटक्यात रामभाऊंच्या व्हरांड्यात आणून ठेवले व 'जावून येतो हं आम्ही' असे म्हणत मशीन रिपेअरी रामभाऊंच्या गळ्यात व तेही त्यांच्या घरांत कशी मारली या आनंदात दोघेजण घराला कुलुप लावून निघून गेले.

मशीन पाठोपाठ रामभाऊ घरात आले. हातातील हत्यारांची पिशवी कोपऱ्यात आदळली. 'मला कामाला लावून रविवार एन्जॉय करतात काय' आता अशी अद्दल घडवितो की परत त्यांचे पाय माझ्या घराकडे वळणार नाहीत. आम्हाला काय बायको नाही, की एन्जॉय करता येत नाही?' असे म्हणत त्यांनी मीनाला चहा करायला सांगितला.

'हे काय, मशीन इथे कशाला आणल ते? इथे काय पसारा कमी आहे?' मीनाने पदराला हात पुसत बाहेर येवून विचारले.

'अग त्यांना जायच होत दवाखान्यात' अशी सुरवात करून मशीन आपल्या घरांत येईपर्यंतची सर्व हकीगत रामभाऊंनी मीनाला सांगितली व 'आत बघच तू हे मशीन महिनाभर येथे पडून रहाते की नाही ते' असे सांगून त्यांनी आपला तोडगा मीनाला सांगितला आणि रविवार एन्जॉय करायचा असे ठरवून चमचमीत जेवण करून चक्क ताणून दिली.

दुपारी वामकुक्षी झाल्या नंतर चहा होईपर्यंत नलू व तिचा नवरा टपकलेच.

'कशी आहे तब्येत तुमच्या नातेवाईकांची?' खरा प्रकार माहीत असूनही मीनाने विषय काढला.

'आता बरी आहे पण वीकनेस फार आला आहे. आणखी आठवडाभर रेस्ट घेण्यास सांगितले आहे' कोणालाही लागू पडावा असा जनरल शेरा नलूने भिरकावला.

'बरं झाल बाई, तुम्ही मशीनचा नाद सोडून दवाखान्यात गेलात ते. मशीन काय आज नाही तर उद्या होईल आणि नाहीच नीट झालं तर नवीन घेता येईल. माणसाच तस नाही एकदा गेलं की गेलं' असे म्हणत मीनाने आपण त्या गावाचे नाही असे दाखविले.

अर्धा पाऊण तास इकडच्या, तिकडच्या गप्पा मारण्यात गेला. डॉक्टर लोकांची बेपर्वाई, औषधांच्या किंमती वगैरे विषयावर चर्चा झाली पण मशीन रिपेअर झाले का असे विचारण्याचा धीर नलूच्या नवऱ्याला झाला नाही. त्याचे मन त्याला खात होते.

'बराय वहिनी येतो आम्ही' असे म्हणून नलूने व तिच्या नवऱ्याने काढता पाय घेतला.' दुसरे दिवशी सकाळीच नलू मीनाच्या बिऱ्हाडी टपकली. तिने मशीनचा विषय काढण्याच्या अगोदरच रामभाऊंनी सांगून टाकले.' वहिनी काल गप्पांच्या ओघात सांगायचे राहूनच गेला. मशीन रिपेअर करण्यात काल दोन तास घालवले पण काही उपयोग झाला नाही. थोडे खोलून बघितले. मशिनचा नालच बाद झालाय आणि काल रविवार. दुकान बंद.'

रामभाऊंनी मशीनला हातही लावला नव्हता हे त्यावरच्या धुळीवरून स्पष्ट दिसत होते. पण तसे कसे म्हणणार?

चार पाच दिवसांनी नलूचा नवरा पुन्हा एकदा रामभाऊंच्या बिऱ्हाडी आला. येता येता शेजारच्या बर्वेना सांगत होता, 'रामभाऊंकडे जाऊन मशीन झाले की नाही ते बघून येतो. चौथा हेलपाटा. काय करणार? अडला नारायण. एवढस काम पण भाव खाणं चालू आहे. कुठून मशीन तिथे ठेवले असे झाले आहे.'

पण यावेळेस रामभाऊंनी मनातल्या प्लॅन प्रमाणे कामात प्रगती केली होती. त्यांनी मशीनचे पार्टस् खोलून एका ट्रे मध्ये ठेवले होते. नलूच्या नवऱ्याचे बर्वेबरोबरचे संभाषण त्याने ऐकले होते. तो आत येताच रामभाऊ म्हणाले 'काय करणार? म्हटलं मशीन हातात घेतलच आहे तर ओव्हरऑल करून टाकू. पुन्हा पाच वर्ष बघायला नको. सर्व भाग सुटे केले आणि जोडण्यासाठी हातात स्क्रू ड्रायव्हर घेऊन खाली वाकलो आणि पाठीत उसण भरली. आता नाईलाजाने चार दिवस रेस्ट. आय ॲम सॉरी. तुम्हाला वाटेल कोठून मशीन माझ्याकडे टाकले.'

आपले वाक्य आपल्याच तोंडावर मारलेले बघून आपले बोलणे रामभाऊंनी ऐकल्याची नलूच्या नवऱ्याची खात्री झाली. त्याचा चेहराच पडला. असू दे, असू दे, आणखी चार दिवस लागू देत, नो प्रॉब्लेम असे म्हणत नलूच्या नवऱ्याने तेथून काढता पाय घेतला.

असे दिवसामागून दिवस व नलूच्या नवऱ्याचे हेलपाटे वाया गेले. मशीनचे सुटे पार्ट रामभाऊंच्या कॉटखाली ट्रे मध्ये पडून होते पण जोडले जात नव्हते.

एक दिवस नलूचा नवरा एका दाढीवाल्या मेकॅनिकला घेऊन आला व मशीनचे पार्ट गोळा करून घेऊन गेला. जाताना त्या मॅकॅनिकचे शब्द रामभाऊंच्या कानावर पडले 'साब ये क्या कर दिया बाबूजीने ? अभी मशीन इतना खोलकर रखा है तो फिट करनेको बहुत खर्च आयेगा. और तुम बोलते है, नाल खराब है, वो नाल तर दिखताच नही इसमे, नया लेना पडेगा.'

'ठीक है ठीक है, जो करना पडेगा वो करना, मै चार्ज दे दूंगा. बोलते है ना नाल के

(पुढील पानावर चालू)



Marathe Pratishthan

(*तोडगा* - मागील पानावरून)

लिये घोडा, वैसा हो गया हमारा, अभी हमको अक्कल आयेगी' नलूच्या नवऱ्याने मेकॅनिकला सांगताना त्याच्याकडे पहाणे टाळले.

आणि मशीनची ही हकीगत रामभाऊ तिखटमीट लावून अपार्टमेंटमध्ये सांगू लागले. मऊ लागले म्हणून कोपराने खणायचे का? उपयोगी पडतो म्हणजे मी नोकर नाही कुणाचा. असे म्हणून नलूच्या नवऱ्याला नावे ठेवू लागले.

मध्यंतरीच्या काळांत रामभाऊंच्या व्हरांड्यात मान मोडून पडलेले टेबल फॅन, सुटे भाग होऊन पडलेले मिक्सर, शॉक बसणारे टेबल लॅम्प्स इत्यादी वस्तू आठ दिवसांत जो तो हुडकून आपल्या घरी घेऊन गेला. प्रत्येकाला निरोप देताना रामभाऊ सांगत होते 'नलूच्या मशीनमुळे तुमचे काम मागे राहिले. व्हेरी सॉरी, परत काही लागले तर अवश्य या. अनमान करू नका.'

***

## या अंकात


१. कै. सुरेशभाऊ पुण्यतिथी (५.२.२००२) : आवाहन पृ.१

२. जाहीर निमंत्रण
वर्धापन दिन समारंभ : पुणे शाखा.................. पृ.२

३. अनुभवामृत - मी तुमचा नाही का?.................. पृ.४
विनायक केशव मराठे

४. प्राप्तिकर : धाडी व जप्ती.......................... पृ.५
गजानन चिंतामण मराठे

५. Kashmir : A challange to Indian Strategists... पृ.६
Col. P. P. Marathe (Retd.)

६. कोडे (कविता).................................. पृ.७
मोरेश्वर हरि मराठे

७. बेजिंग भेट....................................... पृ.८
मोहन सदाशिव मराठे

८. हेडमास्तरांचे अब्राहम लिंकन यांस उत्तर............. पृ.१०
प्रेषक - प्रमोद कृष्ण मराठे

९. क्षणभंगूर क्षण (कविता) ........................ पृ.११
श्रीनिवास नारायण मराठे

१०. तोडगा (कथा).................................. पृ.१३
विठ्ठल महादेव मराठे

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२,३), **सभासद वृत्त** (पृ.३,४),
**हसरे हितगुज** (पृ.५), **खुशीपत्रे** (पृ.७,१२),
**Self Improvement** (पृ.११),
आणि **विवाह सहाय्य** (पृ.११ ते १३)
ही नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

**प्रति**

**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दू. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan